# Pimpri Chinchwad Police Commissionerate

**प्रेस नोट ता. ०८/०१/२०१९**

**पोलीस स्टेशन - वाकड**

**दरोडा टाकुन एकुण कि. रु. १,१५,८४४/- चे महागडया सिगारेट लुटणारे ०५ सराईत गुन्हेगारांना वाकड पोलीसांनी केली अटक**

इसम नामे रोशन रमेश वाधवानी वय ३९ वर्षे, धंदा – नोकरी रा. पीडब्ल्युडी १६/७ पिंपरी कॉलनी पिंपरी पुणे यांचे शगुन चौकामधील बॉम्बे स्टोअर्स या दुकानातील कामगार नामे - अशिष हरले हे त्यांचे पॅशन मोटार सायकल क्रं. एमएच२७/एडब्ल्यु/६३९९ वरुन मारुंजी येथे सिगारेटची डिलीव्हरी करणेसाठी जात असताना दि २७/१२/२०१९ रोजी सकाळी ०९.१५ वा. चे सुमारास तापकिरचौकाकडुन थेरगाव फाट्याचे दिशेने जात असताना त्यांचा पाठलाग करुन एस. के. जिम - २७ चे समोर थेरगांव पुणे येथे पल्सर व अॅक्टीवा दुचाकीवरुन आलेल्या ०५ अनोळखी इसमांनी अशिष हरले यांना पत्ता विचारण्याचे बहाण्याने थांबवुन त्यांना हाताने मारहाण करुन कि. रु. १,१५,८४४/- ची आयटीसी कंपनीच्या वेगवेगळ्या प्रकारचे सिगारेट पाकिटे असलेली बॅग जबरदस्तीने घेवुन गेले म्हणुन दिलेले तक्रारीवरुन अनोळखी ०५ इसमांविरुध्द वाकड पो.स्टे. गु. र. नं. **१०/२०२०** भादंवि कलम ३९५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दाखल गुन्हयाचा तपास करीत असताना घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करता त्यामध्ये आरोपी यांनी गुन्हयात वापरलेल्या गाडयांचे मिळालेले वर्णन तसेच फिर्यादी यांनी आरोपींचे दिलेले वर्णनावरुन घटनास्थळापासुन रोझवुड हॉटेल थेरगांव - बिर्ला हॉस्पिटल - चिंचवड जकातनाका - बिजलीनगर पाण्याची टाकी - खंडोबामाळ चौक - थरमॅक्स चौक - कस्तुरी मार्केट - कृष्णानगर चौकातुन चिखली घरकुल भागाकडे वळलेले दिसुन आले. घटनास्थळापासुन घरकुलपर्यंतचे सुमारे ७० ते ८० ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. चिखली घरकुल परिसरात तपास करुन, गुप्त बातमीदारामार्फत माहीती काढली व सीसीटीव्ही फुटेजमधील वर्णनाच्या ०५ तरुणांना सापळा लावुन मोटर सायकलसह ताब्यात घेतले. त्यांचे कडे चौकशी करता त्यांनी त्यांची नांवे १) अतुल चंद्रकांत निसर्गंध वय २० वर्षे रा. सी/२३ फ्लॅट क्र ५०३ कुलस्वामीनी हौ सोसा घरकुल प्राधिकरण चिंखली पुणे, २) ओंकार उर्फ बाबु नंदकुमार वैराट वय १९ वर्षे रा. बि नं डी/२५ रुम क्र २०३ न्यु कोहीनुर हौ सोसा घरकुल प्राधिकरण चिंखली पुणे, ३) विकास पोपट वायकर वय २१ वर्षे रा. गणेश मंदिरा समोर बडमुखवाडी च-होली पुणे, ४) अँथोनी डॅनियल अरकस्वामी वय २० वर्षे रा. बि नं डी/१३ रुम क्र ५०५ व्हिनस हौ सोसा घरकुल प्राधिकरण चिंखली पुणे, ५) राहुल प्रदिप शिंदे वय २४ वर्षे रा. ए/३२ फ्लॅट क्र ७०३ सदगुरु हौ सोसा घरकुल प्राधिकरण चिखली पुणे. अशी असल्याचे सांगितले. त्यांचेकडे अधिक तपास करता त्यांनी सदर गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. त्यांचेकडे कौशल्युपर्वक तपास करुन गुन्हयातील **एकुण १,३५,०००/- रु. चा** मुद्देमाल त्यामध्ये पल्सर मोटर सायकल, एक अॅक्टिवा गाडी व सिगारेट असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

आरोपी यांचे रेकॉर्ड पाहता त्यांचेविरुध्द खालीलप्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

| आरोपीचे नांव | पोलीस स्टेशन | गु. र. नं. व कलम |
|---|---|---|
| **आ. नं. १** अतुल चंद्रकांत निसर्गंध | चाकण | ३९१/२०१७ भादंवि कलम ४५४,४५७,३८०, |
| | देहुरोड | २६९/२०१७ आर्म ॲक्ट ४(२५), |
| | निगडी | ८३०/२०१८ भादंवि कलम ३७९ |
| | वाकड | १००४/२०१८ भादंवि कलम ३८० |
| आ. नं. ४ अँथोनी डॅनियल अरकस्वामी | चिखली | २५५/२०१९ भादंवि कलम ३९५, आर्म ॲक्ट ४(२५), |
| आ. नं. ५ राहुल प्रदिप शिंदे | पिंपरी | ३८८/२०१८ भादंवि कलम ३८० |
| | पिंपरी | ३८८/२०१५ भादंवि कलम ३२६ |

सदरची कारवाई मा. श्री. संदीप बिष्णोई साो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. श्री. रामनाथ पोकळे साो, अपर पोलीस आयुक्त. पिंपरी चिंचवड, मा. श्री. विनायक ढाकणे साो, पोलीस उप आयुक्त, परि-२, पिंपरी चिंचवड, श्री. श्रीकांत मोहीते, सहा. पोलीस आयुक्त साो, वाकड विभाग, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सतिश माने, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, श्री. राजकुमार राजमाने, पोलीस निरिक्षक (गुन्हे), श्री. हरिष माने सहा. पोलीस निरीक्षक, श्री. सिद्धनाथ बाबर, पोलीस उप निरीक्षक व तपास पथकातील पोलीस कर्मचारी - बिभीषन कन्हेरकर, बापुसाहेब धुमाळ, प्रमोद भांडवलकर, जावेद पठाण, नितीन ढोरजे, रमेश गायकवाड, विक्रम जगदाळे, दिपक भोसले, प्रमोद कदम, विक्रम कुदळ, नितीन गेंगजे, शाम बाबा, सुरेश भोसले, सचिन नरुटे, सुरज सुतार, तात्या शिंदे, प्रशांत गिलबिले यांनी केली.

